**नागरी क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करण्याबाबत सुधारित आदेश**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.**
**दिनांक- ३ मे, २००५.**

**आ दे श**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये राज्य निवडणूक आयोगावर महानगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या निवडणुकांची जबाबदारी सोपविलेली आहे. निवडणुकांची प्रक्रिया प्रभाग रचना करण्यापासून सुरु होते व प्रत्यक्ष मतदान होऊन निकाल शासकीय राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर ही जबाबदारी संपते. यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाने नागरी क्षेत्राच्या निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करण्यासंबंधीच्या काढलेल्या निदेशानुसार आतापर्यंत महाराष्ट्रातील नागरी क्षेत्रांची प्रभागांमध्ये विभागणी होऊन निवडणुका पार पडल्या आहेत.

२. महानगरपालिका, नगर परिषदा तथा नगर पंचायती यांची प्रभाग रचना करताना त्यामध्ये सुसूत्रता राहावी यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५, १८अ(४) व कलम १९(१), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम ९ व ९ब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५ व कलम १४(४) आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम १० व १०अ(४) यानुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन मी नन्द लाल, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र यापूर्वीचे नागरी क्षेत्रातील प्रभाग रचनेचे सर्व आदेश रद्द करुन नागरी क्षेत्रातील प्रभाग रचनेचा प्रस्ताव तयार करण्यासंबंधी खालीलप्रमाणे नव्याने निदेश देत आहे :-

(१) महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधित महानगरपालिकांचे आयुक्त, नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांना राज्य निवडणूक आयोग प्रारुप प्रभाग रचना करण्यासंबंधी अधिकार प्रदान करीत आहे.

(२) महानगरपालिका आयुक्त व संबंधित जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयुक्तांच्या नियंत्रणाखाली प्रारुप प्रभाग रचनेचे काम योग्यप्रकारे करुन घ्यावयाचे आहे.

(३) प्रभाग रचना करताना शेवटच्या प्रसिध्द झालेल्या जनगणनेनुसार लोकसंख्येची आकडेवारी विचारात घ्यावयाची आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचीही आकडेवारी विचारात घ्यावयाची आहे.

(४) नगर परिषदा/नगर पंचायती यांच्यासंदर्भात महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९(२) अनुसार निवडून दयावयाच्या सदस्य संख्येबाबत संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन नगर परिषदा/नगर पंचायत क्षेत्राच्या एकूण निश्चित केलेल्या निवडून दयावयाच्या सदस्य संख्येएवढया प्रमाणात विभागणी करावयाची आहे.

(५) महानगरपालिका क्षेत्रासाठी महानगरपालिकांचे आयुक्त यांनी अधिनियमातील तरतुदींप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेली सदस्य संख्या विचारात घेऊन त्या सदस्य संख्येइतक्या प्रभागांची रचना करावयाची आहे.

(६) महानगरपालिका आणि अ व ब वर्ग नगर परिषदा यांनी परिशिष्ट क्रमांक- १ ते ३ मधील पत्रके, प्रारुप अधिसूचना यासह राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवावयाची आहेत. तर क वर्ग नगर परिषदा आणि नगर पंचायती याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांनी विभागीय आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठवावयाची आहे.

(७) महानगरपालिकांच्या बाबतीत प्रारुप अधिसूचना व नगर परिषदा/नगर पंचायतींच्या बाबतीत प्रारुप आदेशास मान्यता मिळाल्यानंतर मंजूरीच्या पत्रातील सूचनांप्रमाणे आवश्यक तेथे फेरफार करुन ते संबंधित कायदयातील तरतुदी विचारात घेऊन प्रसिध्द करण्यात यावी. यासंबंधी संबंधित क्षेत्रात जास्त खप असलेल्या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस दयावी.

(८) तत्पूर्वी नागरिकांचा मागासवर्ग व स्त्रिया (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग यासह) यासाठी राखून ठेवावयाच्या जागा, सोडत पध्दतीने (लॉटस पध्दतीने) निश्चित करण्यासाठी एक सभा, स्थळ-वेळ व दिनांक निश्चित करुन आयोजित करावी व त्या सभेची माहिती नागरिकांना संबंधित नगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणात खप असलेल्या दैनिक वर्तमानपत्रात नोटीशीद्वारे, महानगरपालिकेच्या संदर्भात महानगरपालिकेचे आयुक्त व नगर परिषदे/नगर पंचायतींच्या संदर्भात संबंधित जिल्हाधिकारी यांनी दयावयाची आहे.

(९) महानगरपालिकांच्या बाबतीत आलेले आक्षेप व सूचना यांना अनुसरुन संबंधितांना सुनावणी राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला राज्य निवडणूक आयोगाचा अधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने प्राधिकृत केलेला अधिकारी यांनी एकत्र दयावयाची आहे. नगर परिषदा/नगर पंचायती यांच्याबाबतीत सुनावणी जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याने दयावयाची आहे.

(१०) सुनावणी झाल्यानंतर व त्यात मांडण्यात आलेला आक्षेप व सूचना याबाबत विचार करुन राज्य निवडणूक आयुक्त हे निश्चित करतील त्या तारखेस अंतिम अधिसूचना/आदेश राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल. नगर परिषदा/नगर

पंचायतींच्या बाबत हा आदेश जिल्हाधिकारी प्रसिध्द करतील व महानगरपालिकांच्या बाबत हा आदेश राज्य निवडणूक आयुक्तांच्या नांवाने महानगरपालिका आयुक्त प्रसिध्द करतील. अ व ब वर्ग नगर परिषदांच्या प्रारुप प्रभाग रचनेमध्ये काही फेरबदल करावयाचा असेल तर त्या बदलाला राज्य निवडणूक आयुक्त यांची मान्यता घेण्यात येईल व त्यांनी मान्यता दिल्यानंतरच असा फेरबदल करता येईल. क वर्ग नगर परिषदा व नगर पंचायतींच्या बाबतीत फेरबदलांना विभागीय आयुक्त यांची मान्यता घेण्यात येईल.

(११) प्रभाग रचना करतेवेळी कोणतीही अडचण निर्माण झाल्यास राज्य निवडणूक आयोगाशी संपर्क साधण्यात यावा व त्यांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन घ्यावे.

## प्रत्यक्ष प्रभाग रचना करणे

(१२) प्रभाग रचना ही लोकसंख्येवर आधारित असते. भारतीय संविधानातील प्रकरण क्रमांक-९अ (नगर पालिका) यामध्ये दिलेल्या लोकसंख्येच्या व्याख्येनुसार लोकसंख्या म्हणजे संबंधित आकडेवारी प्रसिध्द करण्यात आली आहे अशा लगतपूर्वी झालेल्या जनगणनेवर निर्धारित लोकसंख्या. यामुळे प्रभाग रचना करताना जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करुन घेतलेला लोकसंख्येचा तपशील (जनगणना प्रभागनिहाय व प्रगणक गटनिहाय) विचारात घेण्यात यावा.

(१३) जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध झालेल्या लोकसंख्या विचारात घेऊन महानगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायती यांची सदस्य संख्या निश्चित झाल्यानंतर सदस्य संख्येने एकूण लोकसंख्येस भागून येणारी लोकसंख्या ही गुणोत्तर (Ratio) म्हणून विचारात घ्यावी.

(१४) प्रभाग रचना करताना प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या गुणोत्तर लोकसंख्येच्या जवळपास असावी. अपवादात्मक परिस्थितीत एखादया प्रभागाची लोकसंख्या गुणोत्तरापेक्षा १० टक्के कमी किंवा १० टक्के जास्त असू शकेल.

(१५) एखादया प्रभागाची लोकसंख्या १० टक्के मर्यादेपेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्याचे कारण नमूद करणे आवश्यक असेल.

(१६) प्रभाग रचना करताना प्रत्येक प्रभाग हा भौगोलिकदृष्टया सलग असला पाहिजे. त्याच्या सीमारेषा, रस्ते, गल्ल्या, नदया, नाले, सिटी सर्व्हे नंबर इत्यादी नैसर्गिक मर्यादा घेऊन निश्चित करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे मोकळया जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच पाहिजे. प्रभाग रचनेच्या बाबतीत कोणासही शंका उत्पन्न होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नदया, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवे.

(१७) प्रभाग रचना करताना प्रगणक गट शक्यतो फोडू नये. अपवादात्मक परिस्थितीत प्रगणक गट फोडावा लागल्यास त्या प्रगणक गटाची घरयादी उपलब्ध आहे याची खात्री करावी. प्रगणक गट फोडल्यास घरयादीप्रमाणे लोकसंख्या विभागावी व भौगोलिक सीमा योग्य प्रकारे दाखविली जाईल याची काळजी घ्यावी.

(१८) प्रभाग रचना सुरु करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभाग रचना करत सरकावे व शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पध्दतीने दयावेत. प्रभाग रचना करताना भौगोलिक सलगता राहील याची काळजी घ्यावी.

(१९) प्रत्येक प्रभागाच्या सीमारेषेचे वर्णन करताना उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम अशा दिशा नमूद करुन सीमारेषेचे वर्णन करावे. सीमारेषा नमूद करताना शहरातील कुठल्याही नागरिकास प्रभागाची पूर्ण कल्पना येईल याची काळजी घ्यावी.

(२०) प्रभाग रचनेचा प्रस्ताव पाठविताना प्रत्येक प्रभागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांची लोकसंख्या त्याचप्रमाणे प्रभागाची एकूण लोकसंख्या व अनुसूचित जाती व जमातींचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण हे नमूद करावे.

(२१) जनगणनेची आकडेवारी प्रसिध्द झाल्यानंतर होणा-या पहिल्या निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांची लोकसंख्येचे प्रमाण ज्या प्रभागांमध्ये जास्त असेल ते प्रभाग उतरत्या क्रमाने लावून त्याप्रमाणे प्रभाग अनुसूचित जाती व जमातींसाठी आरक्षित ठेवावेत.

(२२) जनगणनेची आकडेवारी प्रसिध्द झाल्यानंतर होणा-या दुस-या निवडणुकीमध्ये जे प्रभाग अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी आरक्षित झाले असतील ते प्रभाग वगळून त्यानंतर उतरत्या क्रमाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची लोकसंख्या असणारे प्रभाग अनुसूचित जाती व जमातींसाठी आरक्षित होतील. परंतु, शहराच्या हद्दीमध्ये बदल होऊन प्रभाग संख्या बदलली असेल तर हे तत्व लागू होणार नाही. त्यावेळी अनुक्रमांक (२१) मधील पध्दतच वापरण्यात येईल.

(२३) प्रभाग रचनेचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे वा विभागीय आयुक्तांकडे पाठविताना महानगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायतींच्या नकाशामध्ये जनगणनेचे वॉर्ड आणि प्रगणक गट स्पष्ट दाखवावेत. प्रगणक गटांचे क्रमांकही दर्शविलेले असावेत. प्रभाग रचनेच्या प्रस्तावाबरोबर जुन्या प्रभागांचा नकाशा व त्यासंदर्भात राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अंतिम अधिसूचनेची/आदेशाची प्रतदेखील पाठवावी.

(२४) प्रारुप प्रभाग रचनेस राज्य निवडणूक आयोगाची/विभागीय आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यापूर्वी संबंधित शहरामध्ये सभा आयोजित करुन सोडत पध्दतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती मधील

स्त्रियांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा, नागरिकांच्या मागासवर्गासाठी (त्यामध्ये स्त्रियांच्या आरक्षणासह) राखीव ठेवावयाच्या जागा व उर्वरित स्त्रियांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा यांचे आरक्षण निश्चित करावे. ती सोडत महानगरपालिकेच्या संदर्भात महानगरपालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होईल. नगर परिषदा/नगर पंचायतींच्या बाबत जिल्हाधिकारी यांच्या किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या अध्यक्षतेखाली होईल.

(२५) सोडतीच्यावेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा सोडतीसाठी येणा-या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा. प्रत्येक प्रभागाच्या सोडतीच्या आधी त्या प्रभागाचा क्रमांक व त्याच्या चतु:सीमा जाहीर कराव्यात.

(२६) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ ते ४ मधील माहिती प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावासोबत भरुन पाठवावयाची आहे.

**( नन्द लाल )**
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

प्रति,

१. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व महानगरपालिका आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
७. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
८. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
९. निवड नस्ती

## परिशिष्ट-१

**महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक-**

१. महानगरपालिकेचे/नगर परिषद/नगर
पंचायतीचे नांव व जिल्हा

२. महानगरपालिका/नगर परिषद/नगर
पंचायत क्षेत्राची एकूण लोकसंख्या
(लगतच्या जनगणनेनुसार)

३. अनुसूचित जातीची लोकसंख्या
(लगतच्या जनगणनेनुसार)

४. अनुसूचित जमातीची लोकसंख्या
(लगतच्या जनगणनेनुसार)

५. निवडून दयावयाच्या महानगरपालिका/नगर परिषद/नगर
पंचायत सदस्यांची संख्या

६. प्रभागांची एकूण संख्या

७. प्रभागाची सरासरी लोकसंख्या

८. अनुसूचित जातीकरिता राखून ठेवावयाचे एकूण प्रभाग
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)
अनुसूचित जातींची लोकसंख्या
(सूत्र=---------------------------- x एकूण सदस्य संख्या)
एकूण लोकसंख्या

९. अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवावयाचे एकूण प्रभाग
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)
अनुसूचित जमातींची लोकसंख्या
(सूत्र=---------------------------- x एकूण सदस्य संख्या)
एकूण लोकसंख्या

१०. नागरिकांच्या मागासवर्गासाठी राखून ठेवावयाच्या

एकूण जागा(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

$$\left(\text{सूत्र= अनुक्रमांक-५ मधील एकूण सदस्य संख्या} \times \frac{२७}{१००}\right)$$

११. अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा-

$$\left(\text{सूत्र=} \frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{३}\right)$$

ब) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

१. अनुसूचित जातीसाठी

$$\left(\text{सूत्र=} \frac{\text{अनूसचित जातींची आरक्षित सदस्य संख्या}}{३}\right)$$

२. अनुसूचित जमातीसाठी

$$\left(\text{सूत्र=} \frac{\text{अनूसचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या}}{३}\right)$$

३. नागरिकांच्या मागासवर्गासाठी

$$\left(\text{सूत्र=} \frac{\text{मागासवर्गीय जमातींची आरक्षित सदस्य संख्या}}{३}\right)$$

४. स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

(सूत्र= अनुक्रमांक-११(अ)-{अनुक्रम-११(ब १.)+११(ब २.)+११(ब ३.)})

५. एकूण

१२. शेरा

**सही**

**आयुक्त, महानगरपालिका/**

**जिल्हाधिकारी, जिल्हा... ... ... ...**

**परिशिष्ट-२ (जनगणना प्रभाग व प्रगणक गटनिहाय लोकसंख्येचा तपशील**

| महानगरपालिका /नगरपरिषदा/ नगर पंचायती निवडणूक प्रभाग क्रमांक | जनगणना प्रभाग क्रमांक | जनगणना प्रगणक गट क्रमांक | प्रगणक गटाची लोकसंख्या (लगतच्या जनगणने-नुसार) | निवडणूक प्रभागासाठी रकाना क्र.४ मधील विचारात घेतलेली लोकसंख्या | रकाना ४ पैकी शिल्लक लोकसंख्या राहिली असल्यास | शेरा- शिल्लक लोकसंख्या कोणत्या निवडणुक प्रभागासाठी विचारात घेतली ते नमूद करणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |

सही

आयुक्त, महानगरपालिका/
जिल्हाधिकारी, जिल्हा-... ... ... ...

# परिशिष्ट-३

## महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक-

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव असल्यास | प्रभागाची व्याप्ती | आरक्षणाची स्थिती किती जागा कोणत्या प्रवर्गासाठी जसे अनु.जाती/अनु.जमाती/ नागरिकांच्या मागासवर्गासाठी या स्त्रियांसाठी (अनु.जाती/अनु.जमाती/नागरिकांचा मागासवर्ग स्त्रियांसाठी धरुन) |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| | | | |
| | | | |
| | | | |

सही

आयुक्त, महानगरपालिका/
जिल्हाधिकारी, जिल्हा-... ... ... ...

## परिशिष्ट-४

### महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक-

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नांव असल्यास | प्रभागाची लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |